मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# भोसरीत भाजपाचा एल्गार; विकसित भारताचा हुंकार!

## ‘सेवा ज्योती यात्रे’तून भाजपाचे शक्तिप्रदर्शन; एकजुटीने भोसरी दणाणली!

» पिंपरी | प्रतिनिधी

**राष्ट्रसेवेचा निर्धार, विकासाचा ध्यास आणि संघटनशक्तीचा जोरदार जागर करीत भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने भोसरी येथे आयोजित ‘विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा’ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. भाजपाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भोसरीत पक्षाच्या संघटनबळाचे प्रभावी दर्शन घडले. ‘संकल्प विकासाचा, ज्योत सेवेची आणि ध्यास विकसित भारताचा’ हा संदेश देत कार्यकर्त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात अधिक ताकदीने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.**



भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून पक्षाच्या संघटनात्मक एकजुटीचे दर्शन घडले. सेवा, सुशासन आणि विकास या त्रिसूत्रीच्या बळावर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. केंद्र आणि राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना, विकासाभिमुख निर्णय आणि विविध उपक्रमांची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असा संदेश या संकल्प सभेतून देण्यात आला.

भोसरीत पार पडलेली ही संकल्प सभा केवळ एक राजकीय कार्यक्रम न ठरता कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा उपक्रम ठरली. शहरातील विविध मंडलांचे अध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी, विविध आघाड्यांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र आल्याने पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचे दर्शन घडले.

पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने जनतेशी थेट संवाद साधून विकासकामांची माहिती पोहोचवावी, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, या भूमिकेला कार्यक्रमात विशेष महत्त्व देण्यात आले. पक्षसंघटना केवळ निवडणुकांपुरती मर्यादित न ठेवता वर्षभर जनसेवेच्या माध्यमातून कार्यरत ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमात भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकासकामांची माहिती प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘विकसित भारत’ संकल्पनेला प्रत्यक्षात साकार करण्यासाठी केवळ सरकारी यंत्रणाच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचा विचार या सभेत मांडण्यात आला. युवक, महिला, शेतकरी, कामगार, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याच्या प्रयत्नांना अधिक गती देण्यावर भर देण्यात आला.

संघटन अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. जनसेवेतून जनविश्वास आणि जनविश्वासातून संघटनविस्तार हा संदेशही या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध मंडलांचे पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा आणि इतर आघाड्यांचे कार्यकर्ते या उपक्रमात एकत्र आले. शहरातील पक्षसंघटनेला अधिक गतिमान करण्यासाठी आणि शासनाच्या विकासाभिमुख धोरणांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी उपक्रमांचे महत्त्व यानिमित्ताने अधोरेखित झाले.

> “‘विकसित भारत’ ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आणि नागरिकाची आहे. सेवा, सुशासन आणि विकासाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आपण सातत्याने केला पाहिजे. ‘सेवा ज्योती यात्रा’च्या माध्यमातून राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ झाली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला जनसहभागाची जोड देत विकासाच्या प्रवाहात प्रत्येक घटकाला सहभागी करून घेण्याचा निर्धार आपण करूया. संघटनेची ताकद ही कार्यकर्त्यांच्या एकजुटीत आहे आणि हीच एकजूट राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला अधिक बळ देईल.”
>
> -महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# घरफोडी, वाहनचोरी करणाऱ्यांना गुन्हे शाखेचा दणका!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरात घरफोडी आणि वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत गुन्हे शाखेच्या युनिट ४ ने चार गुन्हे उघडकीस आणले आहेत. दोन घरफोड्या आणि दोन वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले असून, या कारवाईत दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांनी सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत. गुन्हे प्रतिबंधक गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.**




पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ६ ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन घोडेपाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले आणि त्यांचे पथक गुन्हे प्रतिबंधक गस्तीवर होते. या दरम्यान संशयितांच्या हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर पथकाने कारवाई करत रुषिकेश राजेंद्र भोसले (वय २५, रा. विठ्ठलवाडी, देहूगाव) आणि अशोक राजेंद्र भोसले (वय २५, रा. विठ्ठलवाडी, देहूगाव) यांच्यासह अन्य तिघांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी संशयितांकडून एमएच १३ सीए ८६२८ आणि एमएच १४ बीडब्ल्यू ३९२७ या नोंदणी क्रमांकांच्या दोन दुचाकी जप्त केल्या. या वाहनांची एकूण किंमत सुमारे १ लाख ४० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या संशयितांची सखोल चौकशी केली असता चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या दोन घरफोड्यांबाबत माहिती समोर आली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी या घरफोड्यांची कबुली दिली. त्यानुसार वाहनचोरीच्या दोन आणि घरफोडीच्या दोन अशा एकूण चार गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले.

या कारवाईमुळे उत्तर चाकण, उत्तर महाळुंगे आणि चिखली पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. जप्त केलेल्या दुचाकींची पडताळणी आणि संबंधित गुन्ह्यांबाबतची चौकशी करण्यात आली.

# चिंचवडमध्ये हास्याचा धमाका; नाट्यरसिकांची तुफान गर्दी!

## ‘ऑल दि बेस्ट’ने हसवले खळखळून; ‘वरवरचे वधू-वर’ने जिंकली मने!

**» पुणे | प्रतिनिधी**

**हास्याचे फवारे, टाळ्यांचा कडकडाट आणि नाट्यरसिकांच्या उदंड प्रतिसादाने चिंचवडचे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मंगळवारी अक्षरशः दणाणून गेले. निमित्त होते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ‘अभिजात मराठी भाषा सप्ताहा’निमित्त आयोजित दोन लोकप्रिय मराठी नाटकांचे! दुपारच्या सत्रात ‘ऑल दि बेस्ट’ या विनोदी नाटकाने रसिकांना पोट धरून हसायला लावले, तर सायंकाळी ‘वरवरचे वधू-वर’ या नाटकाने बदलत्या नातेसंबंधांवर मिश्कील भाष्य करत प्रेक्षकांची मने जिंकली. दोन्ही प्रयोगांना झालेली तुडुंब गर्दी, कलाकारांच्या प्रत्येक संवादाला मिळणारी उत्स्फूर्त दाद आणि हास्यकल्लोळामुळे प्रेक्षागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.**



मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ साजरा करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय आणि आशयघन नाटकांची मेजवानी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मंगळवारी दुपारच्या सत्रात देवेंद्र पेम लिखित ‘ऑल दि बेस्ट’ या नाटकाचा प्रयोग रंगला. मयुरेश पेम, मनमित पेम आणि निखिल चव्हाण यांच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. भन्नाट विनोदी प्रसंग, खुसखुशीत संवाद आणि मित्रांमधील गमतीजमतींनी प्रेक्षागृहात हास्याचे कारंजे उडवले. मात्र, केवळ विनोदापुरते मर्यादित न राहता शारीरिक अक्षमतेवर मात करून आत्मविश्वासाने आयुष्य जगण्याचा सकारात्मक संदेशही या नाटकातून देण्यात आला. मैत्री, परस्परांवरील विश्वास आणि संकटात एकमेकांना दिलेली साथ यांचे महत्त्व नाटकाने प्रभावीपणे अधोरेखित केले. कलाकारांच्या सहजसुंदर अभिनयाला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. विशेष म्हणजे, या प्रयोगासाठी प्रेक्षागृह पूर्णपणे भरले होते.

सायंकाळच्या सत्रात विराज कुलकर्णी लिखित-दिग्दर्शित ‘वरवरचे वधू-वर’ या नाटकाने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. सुव्रत जोशी, सखी गोखले आणि सूरज पारसनीस यांच्या अभिनयाने सजलेल्या या नाटकातून आजच्या तरुण पिढीच्या प्रेम, लग्न आणि नातेसंबंधांकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टिकोनाचे चित्रण करण्यात आले. लग्नाचा निर्णय घेताना निर्माण होणारा संभ्रम, जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा, नात्यांमधील गुंतागुंत आणि ‘कमिटमेंट’ स्वीकारताना होणारी मानसिक घालमेल या विषयांना विनोदाची खुमासदार फोडणी देण्यात आली. अनेक प्रसंगांमध्ये रसिकांना स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांचे प्रतिबिंब दिसल्याने नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मिश्कील संवाद आणि सहज अभिनयामुळे प्रेक्षागृहात वारंवार हास्यकल्लोळ उसळला.

एकीकडे ‘ऑल दि बेस्ट’ने मैत्री, आत्मविश्वास आणि सकारात्मकतेचा संदेश दिला, तर दुसरीकडे ‘वरवरचे वधू-वर’ने आधुनिक नात्यांमधील बदलत्या अपेक्षा आणि भावनिक गुंतागुंतीचा वेध घेतला. दोन्ही नाटकांचे विषय वेगवेगळे असले, तरी मनोरंजनासोबत प्रेक्षकांना विचार करायला लावण्याची ताकद या प्रयोगांमधून दिसून आली. नाटक सुरू झाल्यापासून अखेरच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांचा उत्साह कायम होता. कलाकारांच्या अभिनयाला मिळालेल्या भरभरून प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण रंगमय झाले होते.

मराठी रंगभूमीला लाभलेली समृद्ध परंपरा आणि आजच्या काळाशी नाते सांगणारे नवे विषय यांचा सुरेख संगम या नाट्यप्रयोगांतून अनुभवायला मिळाला. महानगरपालिकेच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमांनी मराठी भाषा सप्ताहाला विशेष रंगत आणली. दोन्ही नाटकांना मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे पिंपरी-चिंचवडकरांचे मराठी नाटक, साहित्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांवरील प्रेम पुन्हा एकदा अधोरेखित झाले. मराठी भाषेचा जागर केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता तो थेट रसिकांच्या मनापर्यंत पोहोचत असल्याचे चित्र या निमित्ताने पाहायला मिळाले.

# वाकडमध्ये काळाचा घाला! टेम्पोच्या टपावर बसलेल्या तरुणाचा बळी

**» पुणे | प्रतिनिधी**

**वाकड परिसरात टेम्पोचालकाच्या कथित निष्काळजीपणामुळे एका २० वर्षीय तरुणाला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. टेम्पोच्या टपावर तरुण बसलेला असल्याची माहिती असतानाही चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून वाहन भरधाव वेगाने अंडरपासमधून नेले. यावेळी टेम्पो अंडरपासमधील कॉलमला धडकला. या अपघातात टपावर बसलेल्या तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास वाकड येथील पिंक सिटी रोडवरील सोलिटेअर सोसायटीजवळील अंडरपासमध्ये घडली. या प्रकरणी वाकड पोलिसांनी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.**



ऋषी धनंजय कुदळे (वय २०, रा. लक्ष्मीनगर, थेरगाव) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर तुषार ज्योतीराम माने (वय २२, रा. आदर्श कॉलनी, वाकड) असे गुन्हा दाखल झालेल्या टेम्पोचालकाचे नाव आहे. या प्रकरणी धनंजय श्रीनिवास कुदळे (वय ५०, रा. महादेव कॉलनी, लक्ष्मीनगर, थेरगाव) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तुषार माने हा टाटा कंपनीचा टेम्पो (एमएच १४ एलबी ४५९८) चालवत होता.

या टेम्पोच्या टपावर ऋषी कुदळे बसला होता. टेम्पोच्या वरच्या भागावर तरुण बसल्याची पूर्ण कल्पना चालकाला होती. अशा स्थितीत वाहन चालवताना आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे असतानाही चालकाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. चालकाने वाहन भरधाव आणि निष्काळजीपणे चालवत पिंक सिटी रोडवरील अंडरपासमधून नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी टेम्पोची अंडरपासमधील कॉलमला धडक बसली आणि भीषण अपघात घडला. या धडकेमुळे टेम्पोच्या टपावर बसलेल्या ऋषी कुदळे याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्याच्यावर उपचार करण्यात आले. मात्र, दुखापतीचे स्वरूप गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अवघ्या २० व्या वर्षी ऋषीचा अपघाती मृत्यू झाल्याने ही घटना अत्यंत दुर्दैवी ठरली आहे. वाहनाच्या टपावर बसून प्रवास करणे किती जीवघेणे ठरू शकते, याचे गंभीर उदाहरण या अपघातातून समोर आले आहे.

विशेष म्हणजे, टेम्पोच्या टपावर तरुण बसलेला असतानाही चालकाने वाहन अंडरपासमधून नेल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. अंडरपाससारख्या मर्यादित उंचीच्या ठिकाणातून वाहन नेताना वाहनाची उंची, वर बसलेल्या व्यक्तीची सुरक्षितता आणि मार्गातील अडथळे यांचा विचार करणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणात आवश्यक खबरदारी न घेतल्याने एका तरुणाचा जीव गेल्याचे पोलिसांच्या प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. अपघातानंतर ऋषीचे वडील धनंजय कुदळे यांनी वाकड पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली.

# नेहरुनगर न्यायालयाची वाहतूक कोंडी फुटणार?

## नोटरी वकिलांच्या जागेसाठी प्रशासन सरसावले; बार असोसिएशनच्या पाठपुराव्याला यश!

**» पुणे | प्रतिनिधी**

**नेहरूनगर न्यायालय परिसरातील बेशिस्त वाहन पार्किंग, दररोजची जीवघेणी वाहतूक कोंडी आणि नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांची गैरसोय या गंभीर प्रश्नांवर अखेर प्रशासनाला हालचाली कराव्या लागल्या आहेत. पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अण्णासाहेब मगर स्टेडियमच्या आतील मोकळ्या जागेत तात्पुरते वाहनतळ उभारणे आणि नोटरी वकिलांसाठी स्वतंत्र, सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याच्या पर्यायांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यामुळे वर्षानुवर्षे पार्किंग आणि वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जाणाऱ्या वकील, पक्षकार आणि स्थानिक नागरिकांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. मात्र, केवळ पाहणी आणि चर्चेपुरती ही उपाययोजना मर्यादित न राहता तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, हा महत्त्वाचा प्रश्न कायम आहे.**



नेहरूनगर न्यायालय परिसरातील पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. न्यायालयात येणाऱ्या वाहनांच्या तुलनेत उपलब्ध पार्किंगची जागा अत्यंत अपुरी असल्याने न्यायालय परिसरातील रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागतात. त्याचा थेट परिणाम वाहतुकीवर होत असून परिसरातील नागरिकांनाही मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने महापौर रवी लांडगे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांना निवेदन दिले होते.

या निवेदनाची दखल घेत क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांनी अण्णासाहेब मगर स्टेडियम तसेच नेहरूनगर न्यायालय परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी स्टेडियमच्या आतील बाजूस उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेचा तात्पुरत्या वाहनतळासाठी वापर करण्याच्या शक्यतेवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर रस्त्याच्या दुतर्फा नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी प्रशस्त प्रवेशद्वारासह स्वतंत्र आणि सुसज्ज जागा निर्माण करण्याच्या पर्यायाचाही आढावा घेण्यात आला.

नेहरूनगर न्यायालयात सुमारे दोन हजार नोंदणीकृत वकील असून दररोज सुमारे तीन हजार पाचशेहून अधिक प्रकरणांचे कामकाज चालते. याशिवाय विविध न्यायालयीन कामांसाठी सुमारे दोन हजार पक्षकार, नागरिक आणि पोलीस कर्मचारी न्यायालयात ये-जा करतात. त्यामुळे सकाळपासूनच न्यायालय परिसरात मोठी वर्दळ असते. मात्र, या दैनंदिन वर्दळीच्या तुलनेत वाहनतळाची व्यवस्था अत्यंत तोकडी आहे.

न्यायालयाच्या बेसमेंटमध्ये पार्किंगची सुविधा उपलब्ध असली तरी वाहनांच्या संख्येच्या तुलनेत ती अपुरी पडत आहे. त्यातच बेसमेंटमध्ये पाणी साचण्याची समस्या असल्यामुळे उपलब्ध जागेचा पूर्ण क्षमतेने वापर करणेही अडचणीचे ठरत आहे. परिणामी वकील, पक्षकार आणि नागरिकांना रस्त्याच्या कडेला वाहने उभी करावी लागत आहेत.

न्यायालय परिसरातील अपुऱ्या पार्किंग व्यवस्थेचा फटका केवळ न्यायालयात येणाऱ्यांनाच नव्हे, तर विठ्ठलनगर आणि लगतच्या परिसरातील रहिवाशांनाही बसत आहे. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होत आहे. त्यामुळे वाहनांची ये-जा करताना अडथळे निर्माण होतात. विशेषतः न्यायालयीन कामकाजाच्या वेळेत परिसरातील वाहतूक कोंडी अधिक गंभीर बनते.

या परिस्थितीमुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

# थेरगावात पैशांच्या वादातून रक्तरंजित थरार; चाकूचे वार करून खून!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पैशांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या वादाचे रूपांतर रक्तरंजित हल्ल्यात होऊन एका व्यक्तीचा निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना थेरगाव परिसरात घडली. ओळखीच्याच व्यक्तीने घरात येऊन पैशांच्या वादातून धारदार चाकूने सलग चार ते पाच वार करत एकाचा जीव घेतला. ही घटना सोमवारी (दि. ५ ऑक्टोबर) सकाळी पावणेआठच्या सुमारास थेरगाव येथील मधुबन कॉलनीत घडली. या प्रकरणी काळेवाडी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**




काशीनाथ संभाजी वावळे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून, यल्लालिंग ऊर्फ यल्लाप्पा शिवशरणप्पा आळंदकर (रा. थेरगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी मृत काशीनाथ वावळे यांच्या पत्नीने काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून हा खून झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आळंदकर हा फिर्यादी महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या ओळखीचा होता. सोमवारी (दि. ५ ऑक्टोबर) सकाळी पावणेआठच्या सुमारास तो थेरगाव येथील मधुबन कॉलनीतील फिर्यादी यांच्या घरी आला होता. यावेळी आरोपी आणि काशीनाथ वावळे यांच्यात पैशांच्या देवाणघेवाणीच्या कारणावरून वाद सुरू झाला. सुरुवातीला शाब्दिक स्वरूपात असलेल्या या वादाने काही वेळातच गंभीर वळण घेतले. पैशांच्या व्यवहारावरून निर्माण झालेला वाद इतका विकोपाला गेला की त्याचे रूपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाले.

वादातून संतापलेल्या आरोपी आळंदकर याने काशीनाथ वावळे यांच्यावर धारदार चाकूने हल्ला चढवला. आरोपीने वावळे यांच्या शरीरावर सलग चार ते पाच वेळा चाकूने वार केल्याचे पोलिसांनी सांगितले. अचानक झालेल्या या हल्ल्यात वावळे गंभीर जखमी झाले. धारदार शस्त्राने करण्यात आलेल्या वारांमुळे त्यांना गंभीर दुखापती झाल्या. अखेर या हल्ल्यात काशीनाथ वावळे यांचा मृत्यू झाला. पैशांच्या वादातून एका व्यक्तीचा जीव गेल्याने या घटनेचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.

विशेष म्हणजे, आरोपी हा मृताच्या कुटुंबीयांच्या परिचयातील व्यक्ती असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ओळखीच्या व्यक्तीमध्ये झालेला आर्थिक व्यवहाराचा वाद थेट खुनापर्यंत पोहोचल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. सोमवारी सकाळच्या सुमारास घरामध्येच हा जीवघेणा हल्ला झाल्याने थेरगाव परिसरात खळबळ उडाली आहे. मधुबन कॉलनीसारख्या रहिवासी परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमधूनही चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर काळेवाडी पोलिसांनी आरोपी यल्लालिंग ऊर्फ यल्लाप्पा आळंदकर याला अटक केली आहे. मृताच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीच्या आधारे पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. आरोपी आणि मृत व्यक्ती यांच्यात नेमका किती रकमेच्या व्यवहारावरून वाद झाला होता, पैशांच्या देवाणघेवाणीचा वाद किती दिवसांपासून सुरू होता, तसेच हल्ल्याच्या वेळी नेमकी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती, या बाबींचा उलगडा तपासातून होणे अपेक्षित आहे.

पैशांच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर अशा गंभीर गुन्ह्यात झाल्याने ही घटना धक्कादायक ठरली आहे. ओळखीच्या व्यक्तीनेच घरात येऊन धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप असल्याने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

# पुणे अंधारातच राहणार? 16 हजार विद्युत पोलची गरज!

## ८ हजार जीर्ण पोल बदलण्याचे आव्हान; निधीअभावी प्रकाशव्यवस्थेचे नियोजन अडचणीत

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**स्मार्ट सिटीचा गाजावाजा करणाऱ्या पुणे शहरातील रस्त्यांवर पुरेशी प्रकाशव्यवस्था उभारण्यासाठी महापालिकेसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. शहरातील अंधार दूर करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी तब्बल १६ हजार ६०३ विद्युत पोलची आवश्यकता असल्याची धक्कादायक बाब महापालिकेच्या विद्युत विभागाच्या अहवालातून समोर आली आहे. यामध्ये ८ हजार ९२ जुने आणि जीर्ण झालेले पोल बदलावे लागणार असून, नव्याने विकसित होणारे भाग, निर्जन ठिकाणे आणि रस्तारुंदीकरण झालेल्या परिसरात आणखी ८ हजार ५११ पोल उभारण्याची गरज आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्युत पोल उभारण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाकडे पुरेसा निधीच उपलब्ध नसल्याने पुणेकरांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रकाशव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**



पुणे शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना मूलभूत नागरी सुविधांवरील ताणही वाढत आहे. नव्याने विकसित होणाऱ्या निवासी वसाहती, महापालिकेत समाविष्ट झालेली गावे, रस्तारुंदीकरणाची कामे आणि नियोजित रस्त्यांमुळे पथदिव्यांची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र, या वाढत्या गरजेच्या तुलनेत विद्युत पोल उभारण्यासाठी आवश्यक असलेला निधी अपुरा पडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे एकीकडे शहराच्या विकासाचे दावे केले जात असताना दुसरीकडे अनेक भागांमध्ये पुरेशा प्रकाशव्यवस्थेसाठी महापालिकेला निधीची जुळवाजुळव करावी लागत आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागाने केलेल्या आढाव्यानुसार शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या ८ हजार ९२ जुन्या आणि जीर्ण विद्युत पोलची बदली करणे आवश्यक आहे. याशिवाय निर्जन परिसर, नव्याने तयार झालेले रस्ते, रस्तारुंदीकरण झालेली ठिकाणे आणि प्रकाशव्यवस्था अपुरी असलेल्या भागांमध्ये ८ हजार ५११ अतिरिक्त पोल उभारावे लागणार आहेत.

जुन्या विद्युत पोलची वेळेत बदली न झाल्यास त्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच पुरेशा पथदिव्यांअभावी रात्रीच्या वेळी वाहनचालक, पादचारी आणि स्थानिक नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. विशेषतः निर्जन रस्ते आणि नव्याने विकसित होणाऱ्या भागांमध्ये प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक बनले आहे.

महापालिकेने २०२६-२७ या आर्थिक वर्षात एलईडी पथदिव्यांच्या खरेदीसाठी २१ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या निधीतून सुमारे ३० हजार एलईडी पथदिवे खरेदी करून जुन्या पथदिव्यांच्या जागी बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, नवीन पथदिव्यांसाठी आवश्यक असलेल्या विद्युत पोलची उभारणी करण्यासाठीच पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने महापालिकेच्या नियोजनातील विसंगती समोर आली आहे.

एकीकडे हजारो एलईडी दिवे खरेदी करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असताना दुसरीकडे ते बसविण्यासाठी आवश्यक असलेल्या पोलच्या उभारणीसाठी निधीची कमतरता भासत आहे. त्यामुळे दिव्यांची खरेदी आणि प्रत्यक्ष प्रकाशव्यवस्था उभारणी यामध्ये तफावत निर्माण होण्याची शक्यता आहे. नवीन पोल उभारण्यासाठी वेळेत निधी उपलब्ध झाला नाही, तर शहरातील अनेक भागांमधील प्रकाशव्यवस्था सुधारण्याच्या कामांवर परिणाम होऊ शकतो.

# पुण्यात सीएनजीचा भडका! दर शंभरीपार; रिक्षाचालकांचे गणित कोलमडले!

**» पुणे | प्रतिनिधी**

**महागाईच्या झळा सोसणाऱ्या पुणेकरांसह रिक्षाचालकांना आता सीएनजी दरवाढीचा मोठा फटका बसू लागला आहे. पर्यावरणपूरक इंधन म्हणून प्रोत्साहन दिल्या जाणाऱ्या सीएनजीच्या दराने प्रतिकिलो १०० रुपयांचा टप्पा ओलांडल्याने रिक्षाचालकांचे आर्थिक गणित कोलमडू लागले आहे. पुण्यात सीएनजीचा दर प्रतिकिलो १०० रुपये ५० पैसे, तर पेट्रोलचा दर प्रतिलिटर ११२ रुपये २ पैसे झाल्याची माहिती समोर आली आहे. या वाढत्या इंधन खर्चामुळे रिक्षाचालकांच्या रोजच्या कमाईवर थेट परिणाम होत असून, पर्यावरणाच्या नावाखाली सीएनजी वापरण्यास प्रोत्साहन देणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारने रिक्षाचालकांच्या आर्थिक संरक्षणाची जबाबदारीही स्वीकारावी, अशी मागणी राष्ट्रीय मजदूर संघाने केली आहे.**



कामगार नेते तथा राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष नगरसेवक सुनील शिंदे यांनी सीएनजीच्या वाढत्या दरांबाबत केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीला चालना देण्यासाठी रिक्षाचालकांनी सीएनजीचा स्वीकार केला. मात्र, आता त्याच इंधनाच्या किमती सातत्याने वाढत असताना त्याचा संपूर्ण आर्थिक भार रिक्षाचालकांनीच का सहन करायचा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सीएनजी दरवाढीमुळे रिक्षाचालकांच्या उपजीविकेवर परिणाम होत असल्याने सरकारने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.

पुणे शहरात सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांची संख्या सहा लाख २० हजारांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये एक लाखांहून अधिक रिक्षांचा समावेश आहे. शहरातील मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक वाहतूक सीएनजी इंधनावर अवलंबून आहे. त्यामुळे सीएनजीच्या दरात होणारी वाढ ही केवळ इंधनाच्या किमतीपुरती मर्यादित राहत नाही, तर त्याचा थेट परिणाम रिक्षाचालकांच्या रोजच्या उत्पन्नावर होतो. दिवसभर रिक्षा चालवून मिळणाऱ्या कमाईतून इंधनाचा खर्च, वाहनांची देखभाल-दुरुस्ती, विमा, कर्जाचे हप्ते आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यात इंधन खर्च वाढल्याने प्रत्यक्ष हातात उरणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

सीएनजीच्या वाढत्या दरांमुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेच्या उद्दिष्टांवरही प्रश्न निर्माण होत असल्याचे राष्ट्रीय मजदूर संघाचे म्हणणे आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत सीएनजीला पर्यावरणपूरक पर्याय म्हणून प्रोत्साहन देण्यात आले. त्यानुसार अनेक रिक्षाचालकांनी सीएनजी वाहनांचा स्वीकार केला. मात्र, या इंधनाच्या किमती शंभर रुपयांच्या पुढे गेल्यानंतर सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील कामगारांना कोणते आर्थिक संरक्षण मिळणार, हा महत्त्वाचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला आहे.

'पर्यावरणाच्या दृष्टीने सीएनजी स्वीकारण्याची जबाबदारी रिक्षाचालकांची असेल, तर सीएनजी महाग झाल्यानंतर त्यांना आर्थिक संरक्षण देण्याची जबाबदारी कोणाची?' असा थेट सवाल सुनील शिंदे यांनी केंद्र आणि राज्य सरकारला केला आहे.

देशांतर्गत उपलब्ध होणाऱ्या तुलनेने स्वस्त नैसर्गिक वायूचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे शहर गॅस वितरण कंपन्यांना विविध स्रोतांमधून गॅस खरेदी करावा लागत असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. यामध्ये आयात केलेला द्रवीभूत नैसर्गिक वायू अर्थात एलएनजी आणि बाजाराधारित दराने उपलब्ध होणाऱ्या गॅसचा समावेश असतो. वेगवेगळ्या स्रोतांमधून खरेदी करण्यात येणाऱ्या गॅसचा एकत्रित खर्च वाढल्यास त्याचा परिणाम सीएनजीच्या किरकोळ विक्री दरावर होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, गॅस खरेदीच्या खर्चात होणारे बदल आणि त्यानुसार निश्चित करण्यात येणाऱ्या किरकोळ किमती याबाबत अधिक पारदर्शकता असणे आवश्यक असल्याची भूमिका राष्ट्रीय मजदूर संघाने मांडली आहे. सीएनजीच्या दररचनेत नेमके कोणते घटक समाविष्ट आहेत, करांचा किती भार आहे आणि दरवाढीचा परिणाम सार्वजनिक वाहतूक क्षेत्रावर किती होत आहे, याचा विचार करून सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.